# दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाची आडमुठी भूमिका; भाजप आमदाराच्या 'पीए'लाच फटका


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - १९६ ■ शुक्रवार दि.४ एप्रिल २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 196 ■ Friday Dt.4 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# माणुसकी संपली? सुशांत भिसे यांची पत्नी तनिषा भिसेंचा मृत्यू पैशामुळे

## रुग्णालय प्रशासनाने रुग्णाकडे उपचारांसाठी केली दहा लाखांची मागणी!



- सुशांत भिसे यांच्या गर्भवती पत्नीचा रुग्णालयाच्या आडमुठ्या धोरणामुळे मृत्यू
- हातात अडीच लाख भरायला तयार असूनही रुग्णालयाने दाखल करुन घेतली नाही?
- दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला जीवापेक्षा पैसे महत्वाचे होते का?
- दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई करा; राज्यभरातून संतापाची लाट!
- सुशांत-तनिषाच्या घरी ८ वर्षांनी हलणार होता पाळणा; पण जन्माला येताच दोन मुले झाली पोरकी

बीड । प्रतिनिधी


पुण्यातील प्रसिद्ध असलेल्या दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या आडमुठ्या भूमिकेमुळे एका गर्भवती महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, सत्ताधारी भाजपा आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक (पीए) यांच्या पत्नीबाबत ही प्रकार घडला असून, उपचारासाठी दाखल करून घेण्यासाठी रुग्णालयाने प्रथम दहा लाख रुपये जमा करा, तरच दाखलकरून उपचार सुरू केले जातील अशी भूमिका घेतली. रुग्णालय प्रशासनाने याबाबत काहीही पावले उचलली नाही. त्यामुळे महिला पिंपरी-चिंचवड शहरातील एका रुग्णालयात जाऊन दाखल झाली. त्याठिकाणी महिलेने दोन जुळ्या मुलींना जन्म दिल्यानंतर तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.

पान २ वर









### तर सर्वसामान्य जनतेचे काय? सुप्रिया सुळेंचा संतप्त सवाल

सुप्रिया सुळे यांनी पैशाअभावी अद्ययावत सुविधा असूनही उपचार नाकारले जात असतील तर त्या अतिशय गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त केले आहे. अगदी मंत्रालयातून फोन गेल्यानंतर देखील त्या महिलेला वेळेवर उपचार मिळाले नाहीत. काही तास रुग्णालयाच्या दारात वेदनेने विव्हळत असलेल्या या महिलेचा मानवतेच्या भूमिकेतून देखील रुग्णालय प्रशासनाने विचार केला नाही. मंत्रालयातून विनंती करूनही जर रुग्णालय ऐकत नसेल, तर सर्वसामान्य जनतेचे काय? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी विचारला आहे.

### आमदार गोरखे यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

मृत महिलेचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत. रुग्णालयाच्या प्रशासनाच्या मुजोर कारभाराची माहिती सुशांत भिसे यांनी कळवली असता तेव्हा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून रामेश्वर नाईक यांनी फोन केला. तरी देखील रुग्णालय प्रशासनाने त्यांचे ऐकले नाही. दुसऱ्या रुग्णालयात हलवत असताना महिलेला त्रास झाला. तिची प्रसूती झाली. तिला जुळी मुले झाली. मात्र, त्यानंतर तनिषाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे भिसे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आणि झालेल्या प्रकाराबाबत आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रारही केली असल्याचे सांगितले. दरम्यान, याबाबत दीनानाथ रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. या घटनेनंतर रुग्णालयातील वरिष्ठांकडून झालेल्या प्रकाराची अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आल्याचे बोलले जात आहे. तसेच रुग्णालयाच्या वतीने याबाबत आम्ही शासनाला अहवाल सादर करू, तूर्तास याबाबत भाष्य करणार नसल्याचे सांगितले.

### नेमके काय घडले?

तनिषा भिसे यांना प्रसुतीच्या वेदना सुरू झाल्यावर तातडीने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारासाठी रुग्णालय प्रशासनाने दहा लाख रुपयांची मागणी केली. इतके पैसे कसे आणायचे असा प्रश्न गर्भवती महिलेच्या कुटुंबीयांना पडला. तेव्हा जवळ सध्या ३ लाख रुपये आहेत, तेवढे घेऊन उपचार सुरू करण्याची विनंती कुटुंबीयांनी केली. मात्र तरी देखील महिलेला प्रसुतीसाठी दाखल करून घेतले नाही. त्यानंतर गर्भवती महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. तनिषा भिसे यांना दुसऱ्या रुग्णालयात नेत असताना महिलेला त्रास झाला आणि दोन जुळ्या बाळांना जन्म देऊन महिलेने श्वास सोडला.

## राज्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा धुमाकूळ

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं उन्हाचा चटका जाणवत आहे, तर कुठं ढगाळ वातावरण होत आहे, तर काही ठिकाणी पावसानं हजेरी लावल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या बदलत्या वातावरणाचा शेती पिकांना मात्र मोठा फटका बसताना दिसत आहे. दरम्यान, अशातच हवामान विभागानं पुढील ३ दिवसांचा हवामानाचा अंदाज जाहीर केला आहे. राज्याच्या विविध भागात पुढील ३ दिवस वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**'या' भागात पाऊस पडणार**

दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह



वादळे आणि हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तसेच या भागात ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज देखील हवामान विभागानं वर्तवला आहे.

**शहापूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाची जोरदार हजेरी**

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. या भागात वादळी वाऱ्यासह गारपीट पडत आहे. सध्या नागरिक उकाड्याने हैराण झाले होते, उन्हाचा तडाखा वाढला

पान २ वर

## गहाळ झालेले १३ मोबाईल केले परत

### संभाजीनगर पोलिसांची कामगिरी

परळी । प्रतिनिधी

नागरिकांचे हरवलेले मोबाईल शोधण्याची उल्लेखनीय कामगिरी परळीतील संभाजीनगर पोलिसांनी केली आहे. नागरिकांकडून मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी आल्यानंतर पोलीस ठाण्याने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास केला. या तपासादरम्यान, १३ मोबाईल परत मिळवून त्यांच्या मूळ मालकांना शुक्रवारी (दि.४) सुपूर्द करण्यात आले.

संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक



विश्लेषणाच्या मदतीने मोबाईल शोधकार्य सुरू केले. विविध मोबाईल कंपन्यांचे एकूण १३ मोबाईल, ज्यांची एकूण किंमत ३,२५,००० रुपये होती, ते परत मिळवण्यात यश आले.

पान २ वर

### गहाळ मोबाईल परत दिलेल्या तक्रारदारांची नावे

वसीम सलीम शेख, गणेश राजेभाऊ कोकीळ, कानिफनाथ साधू बनसोड, राधा देविदास कांबळे, तानाजी अंकुश मुळे, राजाराम लक्ष्मण गित्ते, उमाजी चंदू चव्हाण, दिनेश प्रभाकर दहिरे, राजेश पंकज गायकवाड, सचिन ईश्वर कागदे, गहिनीनाथ गुलाबराव शेप, बाबासाहेब सुर्यभान बळवंत सौदागर अंबाजी कादे अशी गहाळ मोबाईल परत मिळालेल्या तक्रारांची नावे आहेत.

# स्वामी समर्थ अन्नछत्र सभागृहासाठी आ. नमिता मुंदडांच्या विकास निधीतून १० लक्ष रुपये

## संसार जीवनात अध्यात्मिक अनुष्ठान महत्वाचे – नंदकिशोर मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी
यशवंतराव चव्हाण चौकालगत असलेल्या शंकर नगर, मोरेवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात अन्नछत्र सभागृह बांधकामासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.सौ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या विकासनिधीतुन सुमारे १० लक्ष रूपये मिळवुन घेवु असं सांगताना संसार जीवनात अध्यात्मिक मार्गाने गेले तर खर्या अर्थाने सुख तिथे मिळते. समाजातील दात्यांच्या योगदानातुन कोणताही यज्ञ पुर्ण करता येणे शक्य असल्याचे प्रतिपादन भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी केले तर भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ही निष्ठा श्री स्वामी समर्थावर ठेवुन मनोभाव सेवा केली तर तो भाविक भक्तांच्या पाठीमागे खंबीर उभा रहातो या शब्दांत भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. शंकर नगर, मोरेवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिन उत्सव हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आली.
सकाळी समर्थांची भव्य मिरवणुक, दुपारी महाआरती व महाप्रसाद वाटप करण्यात आला. दरम्यान याच वेळी मंदिराच्या समोर अन्नछत्रासाठी खरेदी केलेल्या जागेवर मान्यवरांच्या उपस्थितीत भुमीपुजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. सुरूवातीला व्यासपीठावरील मान्यवरांचा मंदिर कमिटीच्या वतीने सत्कार झाल्यानंतर जेष्ठ सामाजिक नेते बन्सीआण्णा सिरसाट यांनी मनोगत व्यक्त करताना या सामाजिक कार्यासाठी आपण हवे तसे सहकार्य करू जिथे धार्मिक उद्दिष्ट असते तिथे आमची सेवा मनोभावे असते असं ते म्हणाले. शंकरराव उबाळे यांनी देखील मनोगतपर भाव व्यक्त करून सहकार्य बोलुन दाखवले. राम कुलकर्णी यांनी विचार मांडताना संसार जीवनात अध्यात्मिक शक्ती खर्या अर्थाने आनंदी जीवनाचा मार्ग असुन ज्या परमेश्वरासाठी आपण निवारा करू तोच आपल्याला निवारा आयुष्यासाठी देवु शकतो. अन्नछत्र बांधकामासाठी योगदान देण्याची संधी मिळणे खर्या अर्थाने भाग्य असुन भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी ही शक्ती दैवी चमत्कार असल्याचे त्यांनी सांगितले. जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी सभागृहासाठी आमदाराच्या वतीने पुढाकार घेताना पहिल्या टप्यात दहा लक्ष रूपये मिळवुन देवु नंतर दुसर्या टप्यात दहा लक्ष रूपये पुन्हा देवुन एक सुसज्ज असं अन्नछत्र सभागृह बांधण्याचा संकल्प त्यांनी बोलुन दाखविला.



माणुस सुखासाठी धडपडतो पण खरं सुख अध्यात्म, ज्ञान मार्गातुन मिळते जिथे दुःखाचा विसर झाल्याशिवाय रहात नाही. कार्यक्रम ाचे प्रास्ताविक मंदिराचे मुख्य सेवेकरी नारायण डांगे यांनी केले. व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य बालासाहेब शेप, श्री काजगुंडे साहेब, सरपंच औदुंबर मोरे, अविनाश मोरे, कमलाकर आण्णा कोपले, श्री करनर साहेब, वसंत आबा मोरे, रामकृष्ण पवार, नागनाथ गित्ते, मारोती मोरे, रविकिरण मोरे, रणजित मोरे, महादेव सोमवंशी, कृष्णा भैय्या लोमटे, विशाल सोनवणे, विकास लामताणे, बाला पाथरकर, व्यंकट किर्दत, मंदार काटे, अनंतराव आरसुडे, राम जाधव, राहुल कदम, जोशी सर, कुलकर्णी काका सर्व सेवेकरी मंडळ यांची उपस्थिती होती. संचलन गणेश मामा काळे यांनी केले. या धार्मिक सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त व महिलांची विशेष उपस्थिती होती.

# सीएस डॉ. अशोक थोरात आणि टीमने घेतलेल्या मेहनतीचे फळ

## मोतीबिंदू शस्त्रक्रियेत बीड जिल्हा पहिला
## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्हा रूग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आणि त्यांच्या टीमने घेतलेल्या मेहनतीचे फळ मिळाले असुन सार्वजनिक आरोग्य विभागात उत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये बीडचा समावेश झाला आहे. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमात बीड जिल्ह्याने उत्तम कामगिरी बजावली असुन मोतीबिंदू शस्त्रक्रियेत बीड जिल्हा पहिला आला आहे.



सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे सहसंचालक डॉ. गोविंद चौधरी यांनी जागतिक आरोग्य दिनानिमित्त ७ एप्रिल २०२५ रोजी मुंबई येथे पुरस्कार सोहळ्याकरीता उपस्थित राहणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची माहिती मागवली आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेत बीड जिल्हा पहिला आला असुन एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत बीड जिल्ह्याला ६ हजार २५१ मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा उध्दीष्ट देण्यात आले होते. त्यापैकी ६ हजार १३२ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. दिलेल्या उध्दीष्टापैकी ९८.१% उध्दीष्ट पुर्ण करत बीड जिल्ह्याने राज्यात उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. जागतिक आरोग्य दिनी दि.७ एप्रिल २०२५ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण मोतीबिंदू शस्त्रक्रियेत बीड सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय कार्यक्रमात मोतीबिंदू शस्त्रक्रियेत उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल बीड जिल्हा रूग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आणि पुर्ण टीमचा सन्मान करण्यात येणार आहे.

**यावर्षी १२ हजारापेक्षा जास्त शस्त्रक्रिया करण्याचा होता मानस**

बीडचे शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आणि त्यांच्या टीमने एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ६ हजार १३२ मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या. शेवटच्या सहा महिन्यांत तब्बल ४०० शस्त्रक्रिया वाढल्या. त्याअनुषंगाने डॉ. थोरात यांनी यावर्षी १२ हजारापेक्षा जास्त मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचा मानस व्यक्त केला होता.

# श्री दक्षिण मुखी हनुमान मंदिर मध्ये रामनवमी निमित्त रामजन्मोत्सव साजरा होणार

## दक्षिण मुखी हनुमान मंदिर कमिटी तर्फे विशेष महाप्रसादाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी
बीड मधील श्री संत ज्ञानेश्वर नगर येथे दक्षिण मुखी हनुमान मंदिर मध्ये दिनांक ६ /४/२०२५ वार रविवार या दिवशी दुपारी ठीक १२ वाजता राम जन्मोत्सव कार्यक्रम साजरा होणार आहे.
कार्यक्रमानंतर लगेच विशेष महाप्रसादाचे आयोजन केलेले आसुन (पुरी, भाजी, कुरडई, पापड, भजे बरोबर सर्व धान्याचे घुगऱ्या) सदर महाप्रसाद घेणे साठी व कार्यक्रमास हजर राहणे साठी हनुमान सेवक तथा दक्षिण मुखी हनुमान मंदिर कमिटीचे अध्यक्ष श्री जगन्नाथ यमपुरे, श्री कारभारी सानप, श्री बाबसाहेब गर्कळ, श्री वचीष्ट जोगदंड, श्री आर्जुन गर्कळ, श्री तानाजी महाजन, श्री आशोक शेळके, श्री श्याम देवडकर, श्री सातपुते सर, श्री नागनाथ कागदे, श्री विनायक सिरसट सर, श्री विजय आगलावे, श्री सोनलाल जानवळे, श्री नानाभाउ कैतके, श्री सत्यकुमार मोरे, श्री मसु कदम, श्री सुधाकर नखाते, श्री जोगदंड जिजा (माजी पिएसआय), श्री डॉ. सावंत, श्री नामदेव डोंगरे, श्री सर्जेराव उगलमुगले, श्री बोट्ठल काटवटे, श्री मच्छिंद्र पवार सर, श्री जालींदर सुर्वे, श्री पांडुरंग भैरट, श्री कचरु चव्हाण, श्री रावसाहेब शेळके, श्री भास्कर वारे, श्री श्रीकीशन वाघमारे सर, श्री राम बोबडे, श्री गहीनीनथ घोरड, व श्री गंगाधर आगरकर यांनी आवाहन केलेले आहे.






यमपुरे जगन्नाथ



कारभारी सानप



गंगाधर आगरकर

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५ व्या स्मृतिदिनी महामानव सार्वजनिक वाचनालय येथे विनम्र अभिवादन

बीड । प्रतिनिधी
कुळवाडी भूषण रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५ व्या स्मृतिदिनी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे महामानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.
आयोजित अभिवादन कार्यक्रम प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हा अध्यक्ष अनिल डोंगरे अध्यक्ष म्हणून तर राणोजी उजगरे महासचिव वंचित बहुजन आघाडी धारूर चे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पदीप धुपाने पूजन करून पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामानवा अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, महामानव वाचनालयाचे उपाध्यक्ष डी.जी वानखेडे व प्रा. अशोक गायकवाड, ड.तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम राऊत यांनी तर प्रस्ताविक अर्जुन जवंजाळ यांनी केले. अनिल डोंगरे यांनी कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातून सुराज्य कसे निर्माण केले व त्यांच्या राज्यकारभाराची नीती तसेच राज्यकारभाराची, शेतकरी, स्त्री व जमीन सुधारण्या करिता व जलनीती करता अमल बजावणी व सर्व समावेशक अठरापगड मावळ्यांना एकत्रित करून राज्यकारभार कसा केला याबद्दल सविस्तर माहिती दिली. महाराजांची राजनीती संपूर्ण जगात आज कशी मार्गदर्शक आहे याबद्दल अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले.
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन करून त्यांच्या जीवनकार्यातून प्रत्येकाला जीवन जगण्याकरता प्रेरणा मिळते हे आवर्जून स्पष्टपणे सांगितले. या कार्यक्रमास आर्वीचे माजी सरपंच लक्ष्मण जोगदंड, अविनाश डोळस, सुधाकर विद्यागर, बि.डी तांगडे, प्रशांत वासनिक व वाचनालयाचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.



# श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याला भाविक- भक्तांनी उपस्थित राहावे : सकल हिंदू समाज



गेवराई । प्रतिनिधी
श्री.राम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात दि. ६ एप्रिल रोजी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी श्री राम भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल हिंदू समाज बांधवांनी केले आहे. गेवराई शहरात मिरवणूक मार्गे भव्य दिव्य शोभायात्रा, भगवान रामाचा जन्मोत्सव साजरा रामनवमी. हिंदू धर्मात या दिवसाला अतिशय महत्व आहे. रामनवमीच्या दिवशी भाविक रामाची विधिवत पूजा करतात. रामाचा जन्मोत्सव असल्याने रामाला पाळण्यात झुलवले जाते. मुहूर्त आणि तिथी पाहून हा सोहळा केला जातो. यादिवशी राम मंदिरामध्ये सजावट करुन महाप्रसादाचे आयोजन देखील केलें जाते काहीजण आजकाल मोठ्या प्रमाणात रामनवमीचा सण साजरा करत श्री भगवान रामाची मिरवणूक मोठ्या थाटामाटात संपन्न होणार आहे तरी सर्व सकल हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# अर्धमसला गावकऱ्यांचे बीड बचाव मंच ने केले हार्दीक अभिनंदन

बीड । प्रतिनिधी
अर्धमसला येथील गावकऱ्यांनी लक्षणीय सहकार्य आणि जागरूकता दर्शविल्यामुळे महाराष्ट्रात सणासुदीच्या काळात मोठा घातपात व अनर्थ टळला. या संदर्भात बीड बचाव मंच द्वारे गावकऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. बीड बचाव मंचच्या कार्यात सक्रिय असलेल्या अनेक सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, वकील संघाचे प्रतिनिधी, शिक्षक संघटनांचे नेतृत्व, सामाजिक प्रतिष्ठानांचे कार्यकर्ते, आणि पत्रकार बंधू एकत्र आले होते. त्यांनी अर्धमसला येथील त्या मशिदीत झालेल्या आतंकवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सजगतेचे उदाहरण मूल्यांकन करीत एकत्र येऊन घेतलेल्या भूमिकेचे कौतुक केले. गावकऱ्यांचे एकत्र येणे आणि सर्व जात–धर्मातील लोकांचे सहकार्य यामुळे महाराष्ट्रात मोठा अनर्थ व घातपात घडवून आणण्याचा कट हाणून पाडण्यात यश मिळवले. या कार्याची दखल घेऊन बीड बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक डी.जी.तांदळे, नितीन जायभाय, भाऊराव प्रभाळे,ड.अनिल बारगजे,ड.नितीन वाघमारे, अशोकराव येडे, डॉ. संजय तांदळे, मौलाना मोईनुद्दीन शेख, बाजीराव ढाकणे, सादेकभाई सय्यद, अब्बासभाई शेख इस्लामपुरा, संजय कुलकर्णी आणि इतर सर्वांनी या अभिनंदन कार्यक्रमात महत्त्वाचा सहभाग घेतला.
सार्वजनिक सहयोगाची गरज या प्रसंगातून सर्व नागरिकांना एकीच्या महत्त्वाची जाणीव झाली आहे आणि त्यांनी समाजाच्या भल्यासाठी संगठित राहण्याची प्रेरणा घेतली आहे. बीड बचाव मंचच्या वतीने केलेल्या या अभिनंदनामुळे स्थानिक जनतेमध्ये एक सहयोगी वातावरण निर्माण करण्यात मदत झाली आहे. अशा आणखी घटनांमध्ये सजगता ठेवणे आणि एकत्र येणे आवश्यक आहे, ज्यामुळे समुदाय अधिक मजबूत होईल.




# व्हाईस ऑफ मीडियाची केज तालुका कार्यकारिणी जाहीर

केज । प्रतिनिधी
व्हाईस ऑफ मीडियाच्या केज तालुकाध्यक्षपदी पत्रकार रामदास साबळे तर कार्याध्यक्षपदी पत्रकार डॉ.हनुमंत सौदागर यांची गुरुवारी (दि.३) बिनविरोध निवड करण्यात आली आहे.





व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुका कार्यकारिणीच्या नूतन पदाधिकारी निवडीची बैठक ज्येष्ठ पत्रकार मधुकर सिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली केज येथील व्हाईस ऑफ मीडियाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीस व्हाईस ऑफ मीडियाचे सचिव दीपक नाईकवाडे, कोषाध्यक्ष संतोष गालफाडे, प्रसिद्धी प्रमुख दिनकर राऊत, संघटक मनोराम पवार, किशोर पत्रावळे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी नूतन तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

पान १ वरून...

## माणुसकी संपली? सुशांत भिसे यांची...

यामुळे दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाईची मागणी केली जात आहे. कर्वेनगरमध्ये राहणारे सुशांत भिसे आणि तनिषा भिसे यांचा ८ वर्षांपूर्वी प्रेम विवाह झाला होता. लग्नाच्या ८ वर्षांनंतर त्यांच्या घरी गुड न्यूज आली. त्यात जुळी बाळं होणार म्हणून घरात सर्व जण अतिशय आनंदात होते. पण प्रसूती वेदना सुरू झालेल्या गर्भवती तनिषाला मंगेशकर रुग्णालयाने दाखल करुन घेतले नाही. यातच तिने दोन बाळांना जन्म दिला. मात्र प्रसूतीनंतर लगेच तिचा मृत्यू झाल्याने कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान ८ वर्षांनी बाळ होणार म्हणून सुशांत अन् तनिषा खूप खूश होते. जुळे बाळ होणार म्हणून त्यांच्यासोबत आनंदाने वेळ घालवण्याचे तनिषाचे स्वप्न मात्र अपूर्णच राहिले. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे दोन बाळांनी आई गमावली.

**आमदार सुरेश धस यांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेतली होती**

भव्यदिव्य ४–५ मजली बांधकाम झालेल्या दवाखान्याचा स्टाफ तर बोलूनच टाकतो की एवढा खर्च आम्ही कुठून काढायचा? खरंतर मोठमोठ्या खाजगी दवाखान्याच्या अनावश्यक लुटीबद्दल कुणीच बोलत नव्हतं. जे कुणी दवाखान्याच्या पायऱ्या चढायचं त्याच कुटुंबाला याचे चटके किती आहेत याची जाण आहे.. सगळेच दवाखाने लुटतात का? उत्तर आहे नाही..! काही चांगले दवाखाने आहेत.. मात्र चांगल्या दवाखान्याची संख्या खूप नगण्य आहे..मात्र जे लुटतात ते दवाखाने त्या कुटुंबाला आर्थिक संकटात ढकले पर्यंत बिल वसूल करतात.. गरज नसलेल्या तपासण्या.. आवश्यकता नसलेले मेडिकल थोपविले जाते.. आजारपणाची भीती हे सगळे करण्यास भाग पाडते.. आ.सुरेश अण्णा धस यांनी सामान्यांच्या मनातला प्रश्न मांडला आहे.. हे मांडण्यासाठी लय धाडस लागतं.. ते अण्णात आहे हे राज्याला चांगलं माहितीय सर्दी पडशाचे दुखणे ५००० पेक्षा जास्त खर्चाचे झाले आहे.. आमदार सुरेश आण्णा धस यांनी उचललेल्या या प्रश्नांवर राज्य सरकारने खरंच एखादे धोरण ठरवून कडक निर्णय घ्यायला पाहिजे.
ग्रामीण भागात सर्व आमदारांकडे मोठ्या प्रमाणात पेशंट येतात. यामध्ये अनेक वेळ 'मुख्यमंत्री सहाय्यता निधीची 'मदत आम्हाला होते. परंतु पेशंटचा मृत्यू झाल्यावर त्यांचे बिल हे एवढ्या मोठ्या प्रमाणात होतात, की त्या पेशंटच्या नातेवाईकांना याचा अनुभव येतो.तसेच प्रत्येक दवाखान्यात डॉक्टरांच्या नातेवाईकांच मेडिकल व्हायला लागलंय! या गोष्टीचा देखील विचार करण्याची गरज आहे. जेवढे दवाखान्याचे बिल होते तेवढेच बिल मेडिकलचे होते.यापूर्वी असं होत नव्हतं. यावर कुठेतरी बंधन येणं गरजेचं आहे. आणि जिथे हे असा प्रकार आढळून येत असेल अशा ठिकाणी कारवाई होण गरजेचं आहे. तसेच ज्या दवाखान्यात चॅरिटी असेल तिथे 'चॅरिटी'चा बोर्ड लावण्याचे अनिवार्य करावे. अशी मागणी यावेळी विधानसभेत बोलताना केली.

## गहाळ झालेले १३ मोबाईल केले परत

तक्रारदारांनी त्यांचे मोबाईल शोधून परत मिळाल्याबद्दल पोलीस प्रशासनाचे आभार मानले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे टेक्निकल नालिसिसचे कामकाज पाहणारे पो.कॉ.व्यंकटी खाडे, बीडचे टेक्निकल नालिसिस सेलचे पो.कॉ.विकी सुरवसे यांनी मोलाची भूमिका बजावली. दरम्यान, १३ मोबाईल परत मिळवून त्यांच्या मूळ मालकांना शुक्रवारी (दि.४) सुपूर्द करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## राज्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा धुमाकूळ

होता. अशातच दुपारनंतर अवकाळी पावसाने हजेरी लावली असून वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. त्यामुळं वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तालुक्यातील काही भागात गारपीट देखील झाली आहे. गारपीट झालेल्या भागात लहान मुले थंडगार गारा वेचण्यात मगं झाल्याचे दिसून येत आहेत.
वादळी वाऱ्याचा मध्य रेल्वेच्या वाहतुकीवर लोकलवर परिणाम
वादळी वाऱ्याचा मध्य रेल्वेच्या वाहतुकीवर लोकलवर परिणाम झाला आहे. आटगाव आणि थानशेत स्टेशनच्या दरम्यान ओव्हर हेड वायरमध्ये पत्रा अडकल्याची घटना घडली आहे. वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळं बाहेरुन पत्रा उडून ओव्हर हेड वायरवर येऊन पडला आहे. यामुळं कसऱ्याहून कल्याणकडे येणाऱ्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. एक लोकल १५ मिनिटे तर त्यामागे एक एक्सप्रेस ८ मिनिटे थांबली होती. पंधरा ते वीस मिनिटे वाहतूक सुरळीत होण्यास लागली.
भिवंडी शहर व ग्रामीण भागामध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात
भिवंडी शहर व ग्रामीण भागामध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली आहे. या वाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात धूळ आहे. वादळी वाऱ्यामुळे नागरिकांची पळापळ सुरु झाली आहे. सकाळपासूनच उकाडा होत असल्याने अचानक वातावरणामध्ये बदल झाला आहे. वादळी वारा व पावसामुळं काही ठिकाणी पत्रे कोसळली तर काही ठिकाणी झाडाच्या फांद्याही पडल्या आहेत. वातावरणामध्ये गारवा निर्माण झाला आहे.

## जालन्यातील गावागावात ना. पंकजा मुंडे यांचे जंगी स्वागत

जालना । प्रतिनिधी
राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या आन्वी येथील संत भगवान बाबा आश्रमशाळेच्या वस्तीगृहाच्या इमारतीचे भूमिपूजन राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज मोठया थाटात झाले.
आन्वी (ता. बदनापूर) येथील पंडित दीनदयाळ शिक्षण संस्थेच्या संत भगवान बाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेच्या नवीन वस्तीगृहाच्या इमारतीचे भूमिपूजन आज राज्यपाल बागडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी नियोजित कार्यक्रमाकडे जात असताना रस्त्यात अकोला (निकळक), आन्वी तसेच गावोगावी ग्रामस्थांनी रस्त्यात वाहनाचा ताफा थांबवून जेसीबीतून फुलांचा वर्षाव करत ना. पंकजाताई व राज्यपाल बागडे यांचे वाजतगाजत जोरदार स्वागत केले. यावेळी गावातील छत्रपती शिवाजी महाराज आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संत भगवान बाबा आश्रमशाळेत संस्थेच्या वतीने ना. पंकजाताईंचे स्वागत करण्यात आले.

# श्री क्षेत्र भगवानगडाच्या नारळी सप्ताहामध्ये भाविकांना ज्ञानदानासोबतच दररोज मिळणार विशेष पदार्थांची मेजवानी

## सप्ताह यशस्वी करण्यासाठी पिंपळनेरकर ग्रामस्थ करताहेत विशेष नियोजन




भगवानगड । प्रतिनिधी

श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९१ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे पिंपळनेर (ता.शिरूर, जि.बीड) ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाची तयारी अंतिम टप्प्यात आली असुन मंडप उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९१ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेऊन बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात.

१० ते १७ एप्रिल हा या महोत्सवाचा कालावधी असून सप्ताहामध्ये दररोज ठीक ३:३० ते ६ या वेळेमध्ये ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज साठे यांची श्रीमद् भागवत कथा संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये अनुक्रमे ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधिकारी भगवानगड), ह.भ.प. प्रभाकर महाराज बोधले (पंढरपूर), ह.भ.प.सोपान महाराज शास्त्री (भागवताचार्य), ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर (समाज प्रबोधनकार), ह.भ.प.अमृत महाराज जोशी (महामंडलेश्वर), ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांवकर) यांच्या कीर्तन सेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये परंपरेप्रमाणे दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रमही होतील.

### किर्तन ऐकताना भाविकांना मिळणार उकाड्यापासून मुक्तता

कडक उन्हाळा जाणवत असल्यामुळे भाविकांना कीर्तन ऐकताना उकाड्यापासून मुक्तता मिळावी म्हणून श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी कीर्तनासाठी स्वतंत्र खुल्या जागेमध्ये कीर्तनाची व्यवस्था केली तर दिवसभरातील कार्यक्रमासाठी स्वतंत्र भव्य मंडपाची उभारणी केलेली आहे.

### दैनंदिन प्रसादासोबत दररोज मिळणार एका नवीन रुचकर पदार्थाची मेजवानी

श्री क्षेत्र भगवानगडाच्या नारळी सप्ताहामध्ये येणाऱ्या लाखो भाविकांना पिंपळनेर ग्रामस्थ दररोज एका विशेष पदार्थाची मेजवानी देणार आहेत. यामध्ये पहिल्या दिवशी पुरणपोळीचा संपूर्ण स्वयंपाक, दुसऱ्या दिवशी बर्फी, तिसऱ्या मुगाचा शिरा, चौथ्या दिवशी शिंगोरी आमटी, पाचव्या दिवशी जिलेबी, सहाव्या दिवशी गुलाब जाम, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या जागराच्या कीर्तनाला सर्व भाविकांना रुचकर आणि स्वादिष्ट शिंगोरी आमटीचा प्रसाद मिळणार आहे. शिवाय काल्याच्या दिवशी १०० पोते साखरेपासून महाप्रसाद बनवला जाणार आहे.

# बारा वर्षे कार्यकाल झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याबद्दल माणुसकीच्या नात्याने विचार करावा : रविंद्र शिनगारे

बीड । प्रतिनिधी

आज पोलीस अधीक्षक कार्यालय येथे जाऊन पोलीस अधीक्षक नवनीत साहेब सह अप्पर पोलीस अधीक्षक पांडकर साहेब यांच्या समवेत बारा वर्षे कार्यकाल झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत चर्चा करत पोलीस दलातील कर्तव्य बजावणाऱ्या तसेच कर्मचाऱ्यांना आरोग्याच्या विविध समस्या असलेल्या बरोबरच महिला पोलीस कर्मचाऱ्य विषयी आपणास विनंती करण्यात येते की, बीड शहरात पोलीस कर्मचाऱ्यांचे बारा वर्ष पूर्ण झालेल्या अशा कर्मचाऱ्यांचे बदलीसाठी अर्ज मागवल्याबाबत. महिला पोलीस तसेच कर्तव्यदक्ष प्रामाणिक कर्मचाऱ्यांना माणुसकीच्या नात्याने सवलत देण्यात



यावी देण्यात यावी. विशेष करून महिला पोलीस कर्मचारी आपले कर्तव्य प्रमाणिकपणे बजावत त्यांना संसार सांभाळावा लागतो. मुलांचे शिक्षण विविध शाळा कॉलेज महाविद्यालय तसेच प्रायव्हेट शिकवणे क्लासेस मध्ये डोनेशन फीस इ.पैसे भरून घेतलेले प्रवेश. वृद्ध सासू-सासरे, काहींना अपंग मुले, काही कर्मचाऱ्यांना शुगर, बीपी, दमा इत्यादी चे त्रास. त्यामुळे आदरणीय साहेबांनी कुटुंबप्रमुखाची भूमिका बजावत सर्वांना न्याय देण्यात यावा. ही नम्र विनंती. पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य. मराठवाडा प्रदेशाध्यक्ष रविंद्र शिनगारे हे आपणास विनंतीच्या माध्यमातून करत आहे. अशी मागणी आज पोलीस अधीक्षक कार्यालय येथे जाऊन केली.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली मा.आ.अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष अँड.राजेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश केल्याबद्दल शेख निजाम यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला.

# परशुराम संस्कार सेवा संघाच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा संपन्न




बीड । प्रतिनिधी

परशुराम संस्कार सेवा संघ महाराष्ट्र राज्य बीड मार्फत दर वर्षी सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते. या वर्षी देखील परशुराम संस्कार सेवा संघा तर्फे दिनांक ०२ एप्रिल २०२५ बुधवार रोजी १०.५४ या अभिजित मुहूर्तावर साई पंढरी मंगल कार्यालय अंकुश नगर बीड या ठिकाणी मोठ्या थाटात संपन्न झाला. या मध्ये १२ बटू च्या सामुदायिक मुंजी आयोजित करण्यात आल्या होत्या. सदरील सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिषजी दामले उपस्थित होते.प्रथम पुरुष मान्यवरांचे स्वागत परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजानन राव जोशी, प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब थिगळे, प्रदेश सचिव संजय कुलकर्णी, प्रदेश संपर्क प्रमुख बाबा पाठक, जिल्हाध्यक्ष मुकुंद खडकीकर यांनी केले आणि महिला मान्यवरांचे स्वागत सौ.मंगल ताई आगवान, सौ.अमृता जोशी, सौ.अर्चना जोशी, सौ.सुषमा ताई थिगळे यांनी केले. महंत अमृतमहाराज जोशी यांनी बटू ना आशीर्वाद दिले. कार्यक्रमास ऍड कालिदास नाना थिगळे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, हेमंत भैय्या क्षीरसागर लोकांक्षाचे संपादक प्रशांत सुलाखे,

एकनाथ महाराज पुजारी, लोकप्रश्नचे संपादक दिलीप खिस्ती, माजी नगरसेवक किशोर काळे, राजेंद्र काळे, परशुराम गुरखुदे, चंद्रकांत नाना मुळे, ब्राम्हण महासंघाचे प्रदेश अध्यक्ष निखिल लातूरकर, प्रदेश सचिव संजय सुपेकर, अभिजित बरिदे, बीड जिल्हा भाजप अध्यक्ष शंकर देशमुख, श्रीमती प्रज्ञाताई रामदासी, सौ सारिकाताई क्षीरसागर, संतोषराव लहाने आदी मान्यवर उपस्थित होते. सदरील सोहळा यशस्वी करण्यासाठी परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजाननराव जोशी, प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब ठिगळे, प्रदेश सचिव संजय कुलकर्णी, प्रदेश संपर्क प्रमुख बाबा पाठक, मराठवाडा अध्यक्ष विनायक देशमुख जिल्हाध्यक्ष मुकुंद खडकीकर, विनोद राव रामदासी, भास्कर मुळे, रवींद्र कुलकर्णी, महेंद्र कुलकर्णी, शशिकांत पाटील, महिला मार्गदर्शक सौ.मंगल ताई आगवान, महिला जिल्हाध्यक्षा सौ अर्चनाताई जोशी, महिला प्रदेश सचिव सौ.अमृता जोशी, सौ सुषमा ताई ठिगळे, सौ.वर्षा देशमुख आदींनी खुप परिश्रम घेतले.

# लिंबागणेश येथे महसूल प्रशासनाच्या जिवंत सातबारा मोहिमेस प्रारंभ

लिंबागणेश । प्रतिनिधी

महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासनामार्फत १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जिवंत सातबारा मोहिम बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड तालुक्यात हि मोहीम राबविण्यात येत असुन आज दि.०४ शुक्रवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे सकाळी मारोती मंदिरात ग्राम महसूल अधिकारी गणपत पोतदार आणि महसूल सेवक ललित काकडे यांनी वाचन केले.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी सरपंच बाळकृष्ण मुळे, ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात, महादेव कुदळे, भालचंद्र गिरे, अनिल ढवळे, विक्रम दाभाडे, प्रमोद निर्मळ, सर्जेराव मुळे, राजेंद्र ढास, संतोष वाणी, चेतन कानिटकर, हरिओम क्षीरसागर, संजय पावले, कल्याण मुळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

**जिवंत सातबारा मोहिमेसाठी व्यापक जनजागृती व अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील राहु : चंद्रकांत शेळके**

शासनाची मोहीम नागरीकांच्या हिताची असुन विहित कालावधीत ग्रामस्थांनी आपल्या सज्जाचे ग्राम महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क करून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. वारसा नोंदी अद्ययावत करून ही मोहीम गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा. समन्वय अधिकारी म्हणून आम्ही सातत्याने संपर्कात राहून व्यापक जनजागृती व अंमलबजावणी साठी प्रयत्नशील राहु असे बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले.

राज्य शासनाने महसूल विभागाचे महत्वाचे दस्तावेज असलेल्या सातबारा उता-यावरील सर्व मयत खातेदारांच्या वारसा नोंदी अधिकार अभिलेख्यात अद्ययावत करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहिम राबविण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तशी घोषणा केलेली आहे. या मोहिमेसाठी आता कृती कार्यक्रम तयार केला असुन त्यासाठी १ एप्रिल ते १० मे २०२५ या कालावधीत जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत वारसांच्या नोंदी सातबारावर घेण्यासाठी गतिमानतेने काम सुरू असुन शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जिवंत सातबारा मोहिम राबवली जात आहे.

या मोहिमेंतर्गत सातबारा वरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. वारसांना विविध कामांसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये वारसाची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणी येतात. हे टाळण्यासाठी राज्यभरात जिवंत सातबारा मोहिम हाती घेण्यात आली आले.या चांगल्या योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामस्थांनी आपल्याकडील आवश्यक कागदपत्रे तातडीने वेळेत ग्राम महसूल यांच्या कडे सादर करून नोंदी अद्ययावत करून घेणे आवश्यक आहे.

# बीड जिल्हा डिजिटल मीडिया परिषदेचे तालुकाध्यक्ष व कार्याध्यक्ष निवड जाहीर

गेवराई । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड जिल्ह्यातील ७ तालुकाध्यक्ष आणि कार्याध्यक्षांसह त्या तालुक्यातील कार्यकारणीची निवड डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी जाहीर केली असून, जिल्ह्यातील सर्व डिजिटल मीडिया परिषदेच्या सक्रिय सदस्यांची नोंदणी करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या क्षेत्रातील युटचुब चॅनेल,



इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून हजारो पत्रकार कार्यरत आहेत. डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील ७ तालुक्यांच्या तालुकाध्यक्ष आणि कार्याध्यक्षांसह त्या तालुक्यातील कार्यकारणी जाहीर केली आहे. यात बीड- तालुकाध्यक्ष- अभिजीत पवार, कार्याध्यक्ष - लक्ष्मण गायकवाड, अंबाजोगाई-तालुकाध्यक्ष- अभिजीत लोमटे, कार्याध्यक्ष- सतीश मोरे, केज- तालुकाध्यक्ष- रामदास तपासे, कार्याध्यक्ष- इकबाल शेख, परळी-तालुकाध्यक्ष- नितीन ढाकणे, कार्याध्यक्ष - सय्यद सहाबत अली, वडवणी- तालुकाध्यक्ष- ओमप्रकाश साबळे, पाटोदा-तालुकाध्यक्ष- गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष - हरिदास शेलार, किल्ले धारूर- तालुकाध्यक्ष- मनोज खिंडरे, कार्याध्यक्ष - सतीश पोतदार या सर्व पदाधिकाऱ्यांची निवड पुढील दोन वर्षासाठी करण्यात आली असल्याचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी जाहीर केले आहे. सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी यांनी डिजिटल मीडिया मध्ये काम करणाऱ्या सर्व पत्रकारांना संघटित करून त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आणि लोक जागृतीसाठी काम करावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या निवड झालेल्या सर्व तालुकाध्यक्ष व नूतन पदाधिकाऱ्यांचे मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाट, मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, परिषदेचे कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, सरचिटणीस सुभाष सुतार, परिषद प्रतिनिधी विलास डोळसे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# पंचायत समितीच्या कामचुकार कर्मचाऱ्यांना बदामराव पंडितांनी काम करण्याची दिली तंबी

गेवराई । प्रतिनिधी

पंचायत समितीच्या सगळ्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी कार्यालयात दररोज वेळेवर उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा योग्य लाभार्थ्यांना तात्काळ लाभ द्यावा शेतकरी आणि गोरगरिबांच्या कामांमध्ये जाणीवपूर्वक अडचण आणली किंवा कामाबाबत त्यांच्याकडून एक रुपया जरी बेकायदेशीर घेतल्याचे माझ्या कानावर आले तर कोणालाही सोडणार नाही. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा संदर्भात तात्काळ निर्णय घ्या. काम घेऊन आलेल्या माणसांमध्ये राजकारण करण्याचा प्रयत्न केला तर त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वटनीवर आणण्याचं काम केले जाईल असा सणसणीत इशारा शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेवराई पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिला आहे.

गेवराई तालुक्यातील विविध ग्रामपंचायती अंतर्गत शासनाच्या योजनांसाठी आलेले प्रस्ताव पंचायत समिती मधील कर्मचारी व अधिकारी अडवण्याचे काम करतात. त्यासोबतच अनेक कामांसाठी पैसे मागितले जातात अशा तक्रारी शेतकरी व लाभार्थ्यांनी केल्याने शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी थेट गेवराई पंचायत समिती कार्यालयामध्ये जावून जनता दरबार भरवला.



## जनता दरबारात काढले अनेक प्रश्न निकाली

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यावेळी म्हणाले की, ग्रामीण भागात मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांची प्रत्येकी १५ हजार रुपये पंचायत समितीने का दिले नाहीत? त्यांच्या आधार कार्ड मध्ये चूक होती तर सहा महिने दुरुस्ती करायला कालावधी का लागला? येत्या आठ दिवसात त्या लाभार्थ्यांची पैसे त्यांच्या खात्यावर पाठवण्यासंदर्भात कारवाई करा. मनरेगा अंतर्गत ३० सप्टेंबर २०२४ पर्यंतच्या आलेल्या प्रस्तावांना काढण्यात आले हा प्रश्न बदामराव पंडित यांनी विचारला. गटविकास अधिकारी शोभा कांबळे यांनी सदर प्रस्तावाचे लॉगिन आता झिरो झाले आहे ते प्रस्ताव आता नव्याने पुन्हा दाखल कराव लागतील असे म्हटले. यावर संतप्त झालेल्या बदामराव पंडित यांनी सदर प्रस्ताव तुमच्या चुकीमुळे लॉगिन झिरो झाले आहे. आता तुम्ही आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी स्वखर्चाने हे प्रस्ताव नव्याने दाखल करावेत. आता शेतकऱ्यांकडे डबल खर्च करायला पैसा नाही असे ठणकावले. शासनाच्या विविध योजनांसाठी तुमच्याकडे येणारे प्रस्ताव गटबाजी आणि राजकारण न करता ते स्वीकारा. कोणाचेही काम वाढले नाही पाहिजे. सध्या तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे आणि गावांना प्यायला पाणी नाही त्या ग्रामपंचायतीचे पाण्यासाठीचे प्रस्ताव तुम्ही स्वतः मागून घ्या असे सुद्धा बदामराव पंडित यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुनावले. कार्यालयात पूर्ण वेळ सगळे कर्मचारी उपस्थित पाहिजेत मी केव्हाही भेट देईल मला जर कोणी गैरहजर दिसला आणि सामान्य शेतकऱ्याला अडवताना समजला तर त्याची वरिष्ठांकडे जाऊन तक्रार करत त्यावर कारवाई करण्यास भाग पाडेल असा सज्जड दमही बदामराव पंडित यांनी यावेळी दिला. गटविकास अधिकारी शोभा कांबळे यांनी यावेळी आठ दिवसात आम्ही आपण दिलेल्या सूचनांचं पालन करून योग्य ती कारवाई करू अशी ग्वाही दिली. यावेळी उपस्थित शेतकरी, सरपंच आणि ग्रामस्थांनी टाळ्या वाजवून बदामराव पंडित यांचे आभार मानले.

या जनता दरबाराला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह युवानेते रोहित पंडित, शिवसेना महिला संघटक मीरा नवले, गटविकास अधिकारी शोभा कांबळे, सहाय्यक गटविकास अधिकारी गायकवाड, पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी उनवणे आणि गायकवाड, घरकुल विभागाचे सुनील थोरात, शिवसेना महिला आघाडीच्या यांच्यासह सर्व अभियंता, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह अनेक ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच आणि शेतकरी मोठ्या संख्येने या बैठकीला उपस्थित होते.

# हायकोर्टाने ही सिरसाळा सरपंचास अपात्र ठरवले!

## जिल्हा अधिकारी यांचा निर्णय विरोधातील सरपंचाची अपील याचिका हायकोर्टाने फेटाळली

सिरसाळा । प्रतिनिधी

दिनांक ४ रोजी सिरसाळा सरपंचाच्या वयाच्या मुद्द्यावरून सिरसाळा ग्रामपंचायतचे सरपंच अन्वर पट्टेदार यांची सरपंच पद मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने देखील अपात्र ठरवले आहे. तसा निकाल नुकताच न्यायालयाने दिला आहे. या अगोदर जिल्हा अधिकारी. विभागीय आयुक्त. यांच्या न्याय दालनात अन्वर पटेदार यांचे सरपंच पद अपात्र ठरविण्यात आले होते. याला आव्हान देत सरपंच अन्वर पट्टेदार यांनी पुढचे दार ठोठावले होते परंतु अगोदर चा निकाल उच्च न्यायालयाने कायम ठेवत अपात्रे बाबत निकाल दिला आहे.



याविषयी सविस्तर वृत्त असे का सरपंच पद निवडणूक लढण्यास वयाची २१ वर्षे पूर्ण असावा लागतात परंतु पट्टेदार यांनी २१ वर्षापेक्षा कमी वय असताना सुद्धा ग्रामपंचायत निवडणूक लढवल्याने सिरसाळा ग्रामपंचायत चे सरपंच अन्वर पट्टेदार यांचा तत्कालीन जिल्हाधिकारी दिनांक २७ जून २०२४ रोजी अपात्र केले होते. त्यानंतर सरपंच पट्टेदार यांची आयुक्ताकडे धाव घेतली परंतु आयुक्तांनी सुद्धा त्यांना अपात्र केल्याने त्यांनी छत्रपती संभाजी नगर हायकोर्टात जिल्हाधिकारी बीड व आयुक्त यांचा निर्णय विरोधात अपील याचिका दाखल केली होती.

त्यांना हायकोर्टाकडून ते मिळाला होता परंतु आठ महिने हायकोर्टाने हे प्रकरण चालवल्यानंतर हायकोर्टाने जिल्हाधिकारी बीड यांनी सिरसाळा सरपंच अन्वर पटेदार यांना अपात्र केलेला निर्णय कायम ठेवत सरपंच पट्टेदार यांची याचिका पेटळण्यात आली आहे. तर प्रतिवादी तर्फे एडवोकेट. आर डी कवडे व सतीश काळे यांनी युक्तिवाद करत कामकाज पाहिले आहे. गेल्या काही दिवसापासून तारीख पे तारीख चालत असताना काल अखेर हायकोर्टाने सरपंच अन्वर पट्टेदार अखेर अपात्र ठरवले आहे. सरपंच अन्वर पटेदार सुप्रीम कोर्टात धाव घेणार असल्याचे बोलल्या जात आहे.

# ना. पंकजाताई मुंडेंचा परळीत हाऊसफुल्ल जनता दरबार; जनतेच्या समस्यांचा जागेवरच निपटारा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा आज परळीत हाऊसफुल्ल जनता दरबार झाला. त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी यश:श्री निवासस्थान अक्षरशः गर्दीने फुलून गेले होते. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला.



ना. पंकजाताई मुंडे यांचे बुधवारी रात्री उशीरा शहरात आगमन झाले. आज सकाळपासूनच यश:श्री निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी मतदारसंघातील, जिल्हयातील तसेच जिल्हया बाहेरून नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांनी जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण केले.

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन् वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती. सत्तेतील मंत्रीपदाचा वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या.

# वडवणी ते थेटेगव्हण रस्त्यासाठी थेटेगव्हण फाटा येथे रास्ता रोको आंदोलन

## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी ते थेटेगव्हण व चिंचवण -कोठरबन-चोरांबा या रस्त्यासाठी थेटेगव्हण फाटा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि.४ एप्रिल २०२५ शुक्रवार रोजी सकाळी १०वा.रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे तरी डोंगरपट्ट्यातील नागरिकांना या रास्तारोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

वडवणी ते थेटेगव्हाण व चिंचवण-कोठरबन-चोरांबा ह्या रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून या रस्त्याकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष असून यामुळे या डोंगरपट्ट्यातील लोकांना व वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे.



वडवणी ते थेटेगव्हण हा रस्ता डोंगरपट्ट्यातील नागरीकांसाठी दळणवळणाचा आहे.व हा रस्ता वडवणी व धारुर या दोन तालुक्याला जोडणारा रस्ता आहे. आणी ह्याच रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असल्याने ह्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर काही वाहनधारक तर तेलगाव मार्गे जात असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी दि.४/४/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा. थेटेगव्हण फाटा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे चिंचवण, पहाडी दहिफळ, पहाडी पारगाव, धुनकवाड, चारदरी व कोठारबन येथील ग्रामस्थ रास्तारोको आंदोलन करणार आहोत. तरी डोंगरपट्याातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# सिरसाळ्यात चिल्ला आणी कान्होबाची काठी ही पुर्वी परंपरा जैसे थे तैसेच : तहसीलदार व्यंकटेश मुंडे

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळ्यात काही दिवसा पुर्वी चिल्ला आणी कान्होबाची काठी या विषयी बीड जिल्ह्यात प्रकरण गाजल होत. म्हणुन (ता.१) मंगळवार रोजी सिरसाळा पोलिस स्टेशन येथे एक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीत दोन्ही समाजाच्या लोकांनी मोठ्या संखेने उपस्थिती दर्शविली होती. दोन्ही समाजांकडून चिल्ला आणी कान्होबाची काठी या विषयी दोन्ही समाजांनकडून प्रस्थिती जाणुन घेतली असता चिल्ला आणी कान्होबाची काठी या जागेत हे पुर्वीपासून परंपरा चालत आलेले आहे अशी दोन्ही समाजातील लोकांनकडून चर्चे दरम्यान एकण्यात आले.



यामुळे गावात काही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी तहसीलदार व्यंकटेश मुंडे, साहाय्यक पोलिस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांनी पुर्वी ज्या प्रकारे परंपरा राबविण्यात आलेले आहे ते जैसे थे तैसेच ठेवण्यात यावे तसेच पुढे काही प्रार्थना करायची असल्यास दोन्ही समाजातील लोकांनी अगोदर प्रशासनास आवगत करावे /माहीती द्यावी असे दोन्ही समाजातील लोकांना प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. यावेळी परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नागरजे साहेब (पुरवठा विभाग) कचरे साहेब, पीएस आय जाधव साहेब, अनवर पट्टेदार, सिरसाळा सज्जाचे तलाठी एरंडे साहेब, ग्रामसेवक अजबे, अक्रम खान पठाण, फेरोज पठाण, सय्यद अजमत (मशायक) नदीम शेख, वैजनाथराव देशमुख, बाबासाहेब (अन्ना) काळे, देवराव काळे, सिरसाळा ग्रामपंचायत चे अव्वल कारकून विश्वंभराव देशमुख आदी नागरीक पत्रकार, पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# कु.साक्षी सुभाष वीर ही M.B.B.S. अंतिम वर्ष परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

बीड । प्रतिनिधी



साक्षी सुभाष वीर हिने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे च.इ.इ.ड. पूर्ण केले. ती सुभाष किशनराव वीर यांची मुलगी असून पाली तालुका बीड येथील रहिवासी आहे. या यशाबद्दल तिचे पाली ग्रामस्थ, शिक्षक नेते केशव आठवले, दिनकर जोगदंड, विकास वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते अजित डोंगरे, लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, अशोक शेजुळ, गणेश चव्हाण, शिलवंत सर, अर्जुन घुमरे यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेत राधा घोलप (तांबे) यांना दोन सुवर्णपदके

बीड । प्रतिनिधी

नुकतीच हनोई, व्हिएतनाम येथे वर्ल्ड योगा स्पोर्ट्स फेडरेशनतर्फे दहावी आंतरराष्ट्रीय योग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत जगभरातील नामांकित योगपटूंनी विविध वयोगटांत सहभाग घेतला. बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध योगतज्ज्ञ श्रीमती राधा घोलप (तांबे) यांची या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. योग क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या श्रीमती राधा तांबे यांनी आपल्या उत्कृष्ट योग सादरीकरणाच्या जोरावर दोन सुवर्णपदके जिंकून देशाचे नाव जागतिक स्तरावर उंचावले. त्यांनी रीदमिक आणि ट्रेडिशनल अशा दोन्ही प्रकारांत सुवर्णपदके मिळवत पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.



बीड जिल्ह्याची ख्याती जागतिक स्तरावर पोहोचवण्याचे श्रेय श्रीमती तांबे यांच्या मेहनतीला जाते. अनेक संघर्षांचा सामना करत, कोणत्याही आर्थिक पाठबळाशिवाय, त्यांनी स्वतःच्या जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. आतापर्यंत त्यांनी थायलंड, नेपाळ आणि आता व्हिएतनाम-अशा तीन आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदके पटकावली आहेत. नेव्हर गिव्ह अप हा त्यांचा दृष्टिकोन, अविरत मेहनत करण्याची तयारी, चिकाटी आणि जिद्द यामुळे त्या सतत नवे शिखर गाठत आहेत. आज त्या असंख्य महिलांसाठी प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत. जहाँ चाह होती है, वहाँ राह भी मिलती है या वचनाची प्रचिती त्यांच्या जीवनसंघर्षाकडे पाहिल्यावर येते.

महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या या कर्तृत्ववान महिलेसाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. आपल्या परिश्रमाने आणि आत्मबळावर परदेशात भारताचे नाव उज्ज्वल करणाऱ्या या वीरांगनेचे संपूर्ण जिल्ह्यात, तसेच विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

# लिंबागणेश येथे अवकाळी पावसाचा आंबा उत्पादक शेतकऱ्यांना फटका

## पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी

लिंबागणेश । प्रतिनिधी

मागील काही दिवसांत उन्हाचा पारा वाढलेला होता त्यामुळे गर्मीचे प्रमाण वाढले होते. मात्र मागील दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे आंबा, ज्वारी यांच्यासह बागायती शेतीचे नुकसान झाले आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात काल दि.३ शुक्रवार रोजी रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने आंबे गळुन पडले असुन बहुतांश शेतकऱ्यांचे पिकायला आलेले आंबे पाऊस तसेच वादळी वाऱ्याने झडले असल्याने आंबा उत्पादक फळबागांचे नुकसान झाले आहे.

**कालच्या चक्रीवादळ पावसाने आंब्याच्या झडती झाली : महादेव जाधव**

लिंबागणेश येथील आंबा उत्पादक शेतकरी महादेव गोपाळ जाधव यांनी २८ वर्षांपासून एक हेक्टर क्षेत्रावर तोतापुरी, हुर, लालबाग, केशर आंबा आदी जातीच्या १०० आंब्याची लागवड केली आहे.



महादेव यांच्या पत्नी गवळण, मुलगा गणेश यांनी पाणीटंचाई असताना देखील टँकरने पाणी घालून जगवली आहे. त्यामुळे बागेतील झाडांना चांगली फळधारणा झाली आहे. मात्र गेल्या २-३ दिवसांपासून असलेले ढगाळ वातावरणामुळे आंब्याचे नुकसान झालेच असुन त्यात दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे काल रात्री झालेल्या चक्री वादळ वा-याने आंब्याची गळती झाली असुन शासनाने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी महसूल प्रशासनाला केली आहे.

**महसूल प्रशासनाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी**

अवकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने रब्बी पिकांसह आंबा फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

महसूल प्रशासनाने पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी फोनद्वारे तहसीलदार चंद्रकांत शेळके, तलाठी गणपत पोतदार आणि कृषी विभागाचे अधिकारी यांच्याशी संवाद साधुन केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT